| Meeting of BOS in Marathi |
|---|
| 7 Jully 2020 |

**MINUTES OF THE FIRST MEETING OF THE MARATHI BOARD OF STUDIES HELD AT NYA. TATYASAHEB ATHALYE ARTS, VED.S.R. SAPRE COMMERCE AND VID. DADASAHEB PITRE SCIENCE COLLEGE, DEVRUKH(AUTONOMOUS)**

**Date :** 7 Jully 2020

**Time :** 11:a.m. to 12:30 p.m.

Zoom Online meeting

**Devrukh Shikshan Prasarak Mandal's**
**Nya. Tatyasaheb Athalye Arts, Ved. S.R. Sapre Commerce and**
**Vid. Dadasaheb Pitre Science College**
**(Autonomous)**
**Devrukh, Dist: Ratnagiri- 415 804, Maharashtra**

---

मंगळवार दिनांक ७ जुलै २०२० रोजी आठल्ये-सप्रे-पित्रे स्वायत्त महाविद्यालय, देवरुखच्या मराठी विषयाच्या अभ्यासमंडळातील सदस्यांची ऑनलाईन सभा सकाळी ११ वाजता संपन्न झाली. सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

१. डॉ. वर्षा शिरीष फाटक अभ्यासमंडळ चेअरमन,
(असिस्टंट प्रोफेसर, मराठी विभागप्रमुख,आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालय)
२. प्रा.अजित जाधव असिस्टंट प्रोफेसर,आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालय,देवरुख
३. डॉ. एल.बी.पाटील प्राचार्य, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा जि.सोलापूर
४. डॉ. तुकाराम रोंगटे असोसिएट प्रोफेसर,पुणे विद्यापीठ मराठी विभागप्रमुख
५. डॉ. राजश्री देशपांडे असिस्टंट प्रोफेसर,फर्ग्युसन कॉलेज, पुणे
६. डॉ. नीतिन आरेकर असोसिएट प्रोफेसर,सी.एच.एम महाविद्यालय, मुंबई
७. डॉ. रणधीर शिंदे असिस्टंट प्रोफेसर,शिवाजी विद्यापीठ मराठी विभागप्रमुख
८. डॉ. निधी पटवर्धन असिस्टंट प्रोफेसर,गोगटे-जोगळेकर महाविद्यालय,रत्नागिरी

अभ्यासमंडळाच्या अध्यक्षा डॉ. वर्षा फाटक यांनी अभ्यासमंडळातील सदस्यांचे स्वागत केले आणि सभेच्या कामकाजास प्रारंभ करून सभेपुढील विषय व अभ्यासक्रमाची रुपरेषा सदस्यांसमोर मांडली. सभेचे कामकाज सकाळी ११ वाजता सुरु झाले दुपारी १२:३० वाजता संपले. सदर सभेत झालेली चर्चा व मंजूर करण्यात आलेले ठराव पुढीलप्रमाणे -

वरील विषयांस अनुसरून झालेल्या चर्चेनुसार खालील ठराव मांडण्यात आले.

**विषय क्रमांक १ दिनांक २५ एप्रिल २०१९ रोजी झालेल्या अभ्यासमंडळाच्या सभेचे इतिवृत्त मंजूर करणे.**

**दिनांक २५ एप्रिल २०१९ रोजी झालेल्या अभ्यासमंडळाच्या सभेचे इतिवृत्त प्रा. अजित जाधव यांनी वाचून दाखवले ते योग्य असल्याचे संकेत सभेकडून मिळाल्यावर पुढील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**ठराव क्रमांक 1 ठराव करण्यात येतो की, दिनांक २५ एप्रिल २०१९ रोजी झालेल्या अभ्यासमंडळाच्या सभेचे इतिवृत्त मंजूर करून कायम करण्यात येत आहे.**

**सूचक: प्रा डॉ तुकाराम रोंगटे**

**अनुमोदक : प्रा. डॉ. निधी पटवर्धन**

**विषय क्रमांक 2 अ) द्वितीय वर्ष कला मराठी अभ्यासपत्रिका UAMAR31 मराठी कादंबरी व UAMAR41 मराठी आत्मकथन विषयांतर्गत साहित्यकृतींची निवड**

**प्रा डॉ वर्षा फाटक यांनी द्वितीय वर्ष कला मराठीच्या जुन्या अभ्यासक्रमाचा आढावा घेऊन द्वितीय वर्ष कलाचा प्रस्तावित अभ्यासक्रम सर्वांसमोर चर्चेसाठी ठेवला. कादंबरी निवडताना विद्यार्थ्यांना उत्तमोतम साहित्यकृतींची, सद्यस्थितीतील सामाजिक व्यवहारांची व तत्कालीन घडामोडींची ओळख व्हावी या हेतूने चर्चेअंती 1) 'रारंगढांग' प्रभाकर पेंढारकर 2) 'राघववेळ' नामदेव कांबळे 3) 'उगम' मोनिका गजेंद्रगडकर या साहित्यकृतींची निवड करण्यात आली.**

**या विषयावर झालेल्या चर्चेअंती पुढील ठराव मंजूर करण्यात आला.**

**ठराव क्रमांक 2 अ) पुढील ठराव करण्यात येतो की,**

**तृतीय सत्रात द्वितीय वर्ष कला मराठी अभ्यासपत्रिका UAMAR31 मराठी कादंबरी या विषयांतर्गत विद्यार्थ्यांना 1) 'रारंगढांग' प्रभाकर पेंढारकर 2) 'राघववेळ' नामदेव कांबळे 3) 'उगम' मोनिका गजेंद्रगडकर यांपैकी कोणत्याही दोन साहित्यकृतींची निवड करण्याचे स्वातंत्र्य देण्यात यावे.**

**विषय क्रमांक 2 ब) चतुर्थ सत्रात द्वितीय वर्ष कला मराठी अभ्यासपत्रिका UAMAR41 मराठी आत्मकथन या विषयांतर्गत 'आत्मकथन' निवडताना विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींची ओळख व्हावी ओळख व्हावी या हेतूने चर्चेअंती 1) 'धडपडणाऱ्या तरुणाईसाठी ' संदीप साळुंखे 2) 'प्रकाशवाटा' डॉ. प्रकाश आमटे 3) 'बिराड' अशोक पवार या साहित्यकृतींची निवड करण्यात यावी.**

**या विषयावर झालेल्या चर्चेअंती पुढील ठराव करण्यात येतो की,**

**ठराव क्रमांक 2 ब) चतुर्थ सत्रात द्वितीय वर्ष कला मराठी अभ्यासपत्रिका UAMAR41 मराठी आत्मकथन या विषयांतर्गत विद्यार्थ्यांना 1) 'धडपडणाऱ्या तरुणाईसाठी ' संदीप साळुंखे 2) 'प्रकाशवाटा' डॉ. प्रकाश आमटे 3) 'बिराड' अशोक पवार यांपैकी कोणत्याही दोन साहित्यकृतींची निवड करण्याचे स्वातंत्र्य देण्यात यावे.**

**सूचक:- डॉ. नीतिन आरेकर**

**अनुमोदक :- डॉ. राजश्री देशपांडे**

**ठराव:- हा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.**

**विषय क्रमांक 3 द्‌वितीय वर्ष कला भाषा आणि भाषाभ्यास मराठी अभ्यासपत्रिका UAMAR41 विषयासाठी अभ्यासक्रमाची निवड**

**तृतीय व चतुर्थ सत्राचा अभ्यासक्रम, मुंबई विद्‌यापीठाच्या द्‌वितीय वर्ष कला मराठी अभ्यासपत्रिका 2 प्रमाणेच ठेवावा असा विचार प्रा. वर्षा फाटक यांनी मांडला. त्यावर डॉ.नीतिन आरेकर यांनी तृतीय सत्रातील अभ्यासक्रम तसाच ठेवून चतुर्थ सत्रात 'मराठीच्या बोलींचा अभ्यास' या अभ्यासपत्रिकेत विद्‌यार्थ्यांना आगरी, वाडवळी व मालवणी यापैकी कोणतीही एक बोली निवडण्याचे स्वातंत्र्य द्‌यावे असे सुचविले.**

**त्यावर चर्चेअंती ठराव करण्यात येतो की,**

**ठराव क्रमांक 3 विद्‌यार्थ्यांना आगरी, वाडवळी व मालवणी यापैकी कोणतीही एक बोली निवडण्याचे स्वातंत्र्य देण्यात यावे.**

**सूचक डॉ. नीतिन आरेकर**

**अनुमोदक डॉ. एल.बी. पाटील**

**ठराव:- हा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.**

**Annexure 1 मध्ये याबाबतचे विश्लेषण सोबत जोडले आहे.**

**Annexure 1.**

**यानुसार द्वितीय वर्ष कला मराठी अभ्यासपत्रिका UAMAR31 मराठी कादंबरी या विषयांतर्गत तृतीय सत्रात एकूण घटक 3 (घटक 3 किंवा 4) श्रेयांकने 3 तासिका 45**

| |
|---|
| **घटक 1. कादंबरी या साहित्यप्रकाराचा सैद्धांतिक परिचय 15 श्रेयांकने 1** |
| **घटक 2. 'रारंगढांग' प्रभाकर पेंढारकर 15 श्रेयांकने 1** |
| **घटक 3. 'राघववेळ' नामदेव कांबळे किंवा घटक 4 यापैकी एकाची विद्यार्थ्यांनी निवड करावी. 15 श्रेयांकने 1** |
| **घटक 4. 'उगम' मोनिका गजेंद्रगडकर 15 श्रेयांकने 1** |

**संदर्भ ग्रंथ :**


1. **साहित्य अध्यापन आणि प्रकार, संपादक श्री.पु. भागवत आणि इतर**
2. **आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड ४,५,६ संपादक रा.श्री.जोग**
3. **आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, अ.ना. देशपांडे**
4. **मराठी कांदबरीतील प्रादेशिकता, डॉ. भास्कर शेळके**
5. **मराठी ग्रामीण कादंबरी, डॉ. रविंद्र ठाकूर**
6. **मराठी कांदबरीचे पहिले शतक, उषा हस्तक**
7. **मराठी कादंबरी : तंत्र आणि स्वरूप, डॉ. मदन कुलकर्णी**
8. **मराठी कादंबरी :चिंतन आणि समीक्षा, डॉ.चंद्रकांत बांदिवडेकर**
9. **कादंबरी : सार आणि विस्तार, डॉ. महेंद्र कदम**
10. **कादंबरीविषयी, हरिश्चंद्र थोरात**


**द्वितीय वर्ष कला मराठी अभ्यासपत्रिका UAMAR41 मराठी आत्मकथन चतुर्थ सत्रात एकूण घटक 3 (घटक 3 किंवा 4) श्रेयांकने 3 तासिका 45**

| |
|---|
| **घटक 1. आत्मकथन या साहित्यप्रकाराचा सैद्धांतिक परिचय 15 श्रेयांकने 1** |
| **घटक 2. -'धडपडणाऱ्या तरुणाईसाठी ' संदीप साळुंखे 15 श्रेयांकने 1** |
| **घटक 3. 'प्रकाशवाटा' डॉ. प्रकाश आमटे किंवा घटक 4 यापैकी एकाची विद्यार्थ्यांनी निवड करावी. 15 श्रेयांकने 1** |
| **घटक 4. 'बिराड' अशोक पवार 15 श्रेयांकने 1** |

**संदर्भ:**


1. **चरित्र आत्मचरित्र, अ.म.जोशी**
2. **चरित्र - आत्मचरित्र, सदा कऱ्हाडे**
3. **आत्मचरित्र मीमांसा, आनंद यादव**

4. मराठीतील आत्मचरित्र लेखन, उषा हस्तक
5. मराठी वाङ्मय कोश, खंड 4, संपादक, विजया राजाध्यक्ष
6. आत्मचरित्र, मराठी विश्वकोश, खंड 2
7. 20 व्या शतकातील मराठी आत्मचरित्र, उषा हस्तक

द्वितीय वर्ष कला भाषा आणि भाषाभ्यास मराठी अभ्यासपत्रिका UAMAR32 विषयासाठी
तृतीय सत्रात सत्रात एकूण घटक 3 श्रेयांकने 3 तासिका 45

| |
|---|
| घटक 1. मानवी भाषेचे स्वरूप, एकूण व्याख्याने 15 श्रेयांकने 1 |
| घटक 2. अ)भाषा समाज आणि संस्कृती<br>आ) भाषेचा विकास आणि ऱ्हास-संकल्पनाविचार एकूण व्याख्याने 15 श्रेयांकने 1 |
| घटक 3.अ) भाषा, प्रमाणभाषा आणि बोली- संकल्पनाविचार:<br>आ) बोलींच्या अभ्यासाची गरज व महत्व : एकूण व्याख्याने 15 श्रेयांकने 1 |

संदर्भग्रंथ :

1. सामाजिक भाषाविज्ञान डॉ.रमेश धोंगडे
2. भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण: सर्वेक्षण मालिका मुख्य संपादक -डॉ. गणेशदेवी महाराष्ट्र खंड संपादन: अरुण जाखडी पद्मगंधा प्रकाशन, २०१३

द्वितीय वर्ष कला भाषा आणि भाषाभ्यास मराठी अभ्यासपत्रिका UAMAR42 विषयासाठी
चतुर्थ सत्रात सत्रात एकूण घटक 3 श्रेयांकने 3 तासिका 45
मराठीच्या बोलींचा अभ्यास (यामध्ये विद्यार्थ्यांनी आगरी, वाडवळी व मालवणी यापैकी कोणतीही एक बोली निवडावी. याबाबतचे विश्लेषण सोबत जोडले आहे.)

| |
|---|
| घटक 1. आगरी बोलीची वैशिष्ट्ये, व्युत्पत्ती आणि विकास, व्याकरणिक वैशिष्ट्ये उच्चारप्रक्रिया, म्हणी, वाकप्रचार शब्दसंग्रह इत्यादी आ) आगरी लोकसंस्कृती, आगरी बोलीचे प्रभावक्षेत्र, आगरी साहित्याचा इतिहास एकूण तासिका 15 श्रेयांकन 1 |
| घटक 2. आगरी बोलीतील निवडक कवितांचा अभ्यास एकूण तासिका 15 श्रेयांकन 1 |
| घटक 3. आगरी बोलीतील निवडक कथांचा अभ्यास एकूण तासिका 15 श्रेयांकन 1 |

| |
|---|
| घटक 1. मालवणी बोलीची वैशिष्ट्ये, व्युत्पत्ती आणि विकास, व्याकरणिक वैशिष्ट्ये उच्चारप्रक्रिया, म्हणी, वाकप्रचार शब्दसंग्रह इत्यादी आ) मालवणी लोकसंस्कृती, मालवणी बोलीचे प्रभावक्षेत्र मालवणी साहित्याचा इतिहास एकूण तासिका 15 श्रेयांकन 1 |
| घटक 2. मालवणी नाटक 'चाकरमानी' मच्छिंद्र कांबळी एकूण तासिका 15 श्रेयांकन 1 |
| घटक 3. मालवणी बोलीतील निवडक कथांचा अभ्यास एकूण तासिका 15 श्रेयांकन 1 |

| |
|---|
| घटक 1. वाडवळी बोलीची वैशिष्ट्ये, व्युत्पत्ती आणि विकास, व्याकरणिक वैशिष्ट्ये उच्चारप्रक्रिया, म्हणी, वाकप्रचार शब्दसंग्रह इत्यादी आ) वाडवळी लोकसंस्कृती, वाडवळी बोलीचे प्रभावक्षेत्र, वाडवळी साहित्याचा इतिहास एकूण तासिका 15 श्रेयांकन 1 |
| घटक 2. वाडवळी कादंबरी 'कोपात' रेमंड मच्याडो एकूण तासिका 15 श्रेयांकन 1 |
| घटक 3. वाडवळी बोलीतील निवडक कथांचा अभ्यास एकूण तासिका 15 श्रेयांकन 1 |

**संदर्भग्रंथ :**


1. भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण: सर्वेक्षण मालिका मुख्य संपादक -डॉ. गणेशदेवी महाराष्ट्र खंड संपादन: अरुण जाखडी पद्मगंधा प्रकाशन, २०१३

**विषय क्रमांक 4. विद्यार्थ्यांच्या अंतर्गत मूल्यमापन व सत्राच्या अखेरीस होणाऱ्या लेखी परीक्षेबाबत चर्चा**

**विद्यार्थ्यांच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप ठरविताना सत्राअखेरीस ७० गुणांची लेखी परीक्षा व ३० गुणांचे अंतर्गत मूल्यमापन अशी प्रत्येक विषयपत्रिका १०० गुणांची असावी. त्यामध्ये अंतर्गत मूल्यमापनामध्ये अभ्यासक्रमबाह्य वाङ्मयीन उपक्रम घ्यावेत जेणेकरून विद्यार्थी स्वयंअध्ययनास प्रवृत्त होतील असा विचार मांडून डॉ एल.बी.पाटील यांनी गुगल फॉर्मचा वापर करून विद्यार्थ्यांना गृहपाठ सोडविण्यास द्यावेत असे सुचविले. तसेच दोन्ही सत्राच्या अखेरीस घेतल्या जाणाऱ्या ७० गुणांच्या परीक्षेचे स्वरूप यावर चर्चा करण्यात आली.**

**चर्चेअंती पुढील ठराव करण्यात येतो की,**

**ठराव क्रमांक 4 विद्यार्थ्यांच्या सत्राअखेरीस घेतल्या जाणाऱ्या ३० गुणांच्या अंतर्गत मूल्यमापनामध्ये अभ्यासक्रमबाह्य वाङ्मयीन उपक्रम, चाचणी, गृहपाठ वा सादरीकरण व दोन्ही सत्राच्या अखेरीस घेतल्या जाणाऱ्या ७० गुणांच्या परीक्षेचे स्वरूप अशारीतीने सर्वसमावेशक असावे.**

**सूचक:- डॉ तुकाराम रोंगटे**

**अनुमोदक:- डॉ. रणधीर शिंदे**

**अंतर्गत मूल्यमापनाचे विश्लेषण Annexure 2.मध्ये जोडले आहे.**

**तृतीय व चतुर्थ सत्राच्या अखेरीस घेतल्या जाणाऱ्या ७० गुणांच्या प्रश्नपत्रिकांचे स्वरूप Annexure 3 मध्ये जोडले आहे.**

**ठराव:- हा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.**

**Annexure 2.**

**द्वितीय वर्ष कलाच्या मराठी अभ्यासपत्रिका क्रमांक UAMAR31 व UAMAR41 चे अंतर्गत मूल्यमापन तृतीय सत्र व चतुर्थ सत्र**

| अनु क्र | प्रश्नस्वरूप | गुण |
|---|---|---|
| 1 | चाचणी दोन्ही सत्रांत तिन्ही घटकांवर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्न वा टीपा | 10 |
| 2 | गृहपाठ/ प्रकल्प सादरीकरण/चर्चासत्र गटचर्चा/अभिवाचन/ मराठी वाङ्मय मंडळ कार्यक्रमात सहभाग/जिल्हा ते आंतरराष्ट्रीय स्तरावरील यशस्वी सहभाग | 10 |
| 3 | वर्गातील उपस्थिती | 10 |

**द्वितीय वर्ष कलाच्या मराठी अभ्यासपत्रिका क्रमांक UAMAR32 व UAMAR42 अंतर्गत मूल्यमापन तृतीय व चतुर्थ सत्रात अभ्यासक्रमास नेमलेल्या घटकांवर आधारित**

| अनु क्र | प्रश्नस्वरूप | गुण |
|---|---|---|
| 1 | चाचणी भाषेचे स्वरूप, लक्षणे, प्रमाणभाषा भाषा व बोली स्वरूप, निवडलेल्या बोलीतील वाकप्रचार, म्हणी या तिन्ही घटकांवर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्न वा टीपा | 10 |
| 2 | गृहपाठ/ प्रकल्प सादरीकरण/चर्चासत्र गटचर्चा/अभिवाचन/ मराठी वाङ्मय मंडळ कार्यक्रमात सहभाग/जिल्हा ते आंतरराष्ट्रीय स्तरावरील यशस्वी सहभाग निवडलेल्या बोलीतील म्हणी, वाकप्रचार व शब्द संकलन, काव्य व नाट्यउताऱ्यांचे सादरीकरण | 10 |
| 3 | वर्गातील उपस्थिती | 10 |

**अशा तऱ्हेने ३० गुणांसाठी केल्या जाणाऱ्या मूल्यमापनाची रूपरेषा सर्वानुमते ठरविण्यात आली.**

**Annexure 3**

**मराठी अभ्यासपत्रिका क्रमांक UAMAR31 तृतीय सत्र गुण ७० वेळ २ तास ३० मिनिटे**

| अनु क्र | प्रश्नस्वरूप | गुण |
|---|---|---|
| 1 | कादंबरी या साहित्यप्रकारावर (तात्विक वा ऐतिहासिक) अंतर्गत पर्याय असणारा दीर्घोत्तरी प्रश्न | 20 |
| 2 | 'रारंगढांग' या कादंबरीवर अंतर्गत पर्याय असणारा दीर्घोत्तरी प्रश्न | 20 |
| 3 | 'राघववेळ' या कादंबरीवर अंतर्गत पर्याय असणारा दीर्घोत्तरी प्रश्न | 20 |
| 4 | 'उगम' या कादंबरीवर अंतर्गत पर्याय असणारा दीर्घोत्तरी प्रश्न<br>विद्यार्थ्यांनी घटक 3 किंवा 4 पैकी निवडलेल्या साहित्यकृतीवरील प्रश्न सोडवावा. | 20 |
| 5 | घटक 3, 4, 5, वर आधारित 9 प्रश्नांपैकी कोणतेही पाच प्रश्न सोडवावेत. | 10 |

**मराठी अभ्यासपत्रिका UAMAR41 चतुर्थ सत्र गुण ७० वेळ २ तास ३० मिनिटे**

| अनु क्र | प्रश्नस्वरूप | गुण |
|---|---|---|
| 1 | आत्मकथन या साहित्यप्रकारावर अंतर्गत पर्याय असणारा दीर्घोत्तरी प्रश्न | 20 |
| 2 | 'धडपडणाऱ्या तरुणाईसाठी' या आत्मकथनावर आधारित अंतर्गत पर्याय असणारा दीर्घोत्तरी प्रश्न | 20 |
| 3 | 'प्रकाशवाटा' या आत्मकथनावर आधारित अंतर्गत पर्याय असणारा दीर्घोत्तरी प्रश्न | 20 |
| 4 | 'बिराड' या आत्मकथनावर आधारित अंतर्गत पर्याय असणारा दीर्घोत्तरी प्रश्न<br>विद्यार्थ्यांनी घटक 3 किंवा 4 पैकी निवडलेल्या साहित्यकृतीवरील प्रश्न सोडवावा. | 20 |

| | | |
|---|---|---|
| 5 | घटक 3, 4, 5, वर आधारित 9 प्रश्नांपैकी कोणतेही पाच प्रश्न सोडवावेत. | 10 |

मराठी अभ्यासपत्रिका क्रमांक UAMAR32 तृतीय सत्र गुण ७० वेळ २ तास ३० मिनिटे

| अनु क्र | प्रश्नस्वरूप | गुण |
|---|---|---|
| 1 | घटक 1. मानवी भाषेचे स्वरूप, दीर्घोत्तरी प्रश्न वा दोन टीपा अंतर्गत पर्यायासह युनिट 1 | 20 |
| 2 | घटक 2. अ)भाषा समाज आणि संस्कृती<br>आ) भाषेचा विकास आणि ऱ्हास-संकल्पनाविचार दीर्घोत्तरी प्रश्न वा दोन टीपा अंतर्गत पर्यायासह युनिट 2 | 20 |
| 3 | घटक 3.अ) भाषा, प्रमाणभाषा आणि बोली- संकल्पनाविचार:<br>आ) बोलींच्या अभ्यासाची गरज व महत्व दीर्घोत्तरी प्रश्न वा दोन टीपा अंतर्गत पर्यायासह युनिट 3 | 20 |
| 4 | वरील तीनही युनिटवर आधारित एका वाक्यातील प्रश्न (8 पैकी 5 प्रश्न सोडविणे प्रत्येकी 2 गुण) | 10 |

मराठी अभ्यासपत्रिका क्रमांक UAMAR42 चतुर्थ सत्र गुण ७० वेळ २ तास ३० मिनिटे

| अनु क्र | दीर्घोत्तरी प्रश्न | गुण |
|---|---|---|
| 1 | घटक 1. आगरी, वाडवळी व मालवणी यापैकी निवडलेल्या बोलीची वैशिष्ट्ये, व्युत्पत्ती आणि विकास, व्याकरणिक वैशिष्ट्ये उच्चारप्रक्रिया, म्हणी, वाकप्रचार शब्दसंग्रह आ) आगरी लोकसंस्कृती, आगरी बोलीचे प्रभावक्षेत्र, आगरी साहित्याचा इतिहास यावर आधारित दीर्घोत्तरी प्रश्न वा दोन टीपा अंतर्गत पर्यायासह युनिट 1 | 20 |
| 2 | घटक 2. आगरी, वाडवळी व मालवणी यापैकी निवडलेल्या बोलीतील निवडक कविता, कथा कादंबरी वा नाटक यांवर आधारित दीर्घोत्तरी प्रश्न वा दोन टीपा अंतर्गत पर्यायासह युनिट 2 | 20 |
| 3 | आगरी, वाडवळी व मालवणी यापैकी निवडलेल्या बोलीतील निवडक कविता, कथा कादंबरी वा नाटक यांवर आधारित दीर्घोत्तरी प्रश्न वा दोन टीपा अंतर्गत पर्यायासह युनिट 3 | 20 |
| 4 | आगरी, वाडवळी व मालवणी यापैकी निवडलेल्या बोलीतील निवडक कविता, कथा कादंबरी वा नाटक यांवर आधारित एका वाक्यातील प्रश्न (8 पैकी 5 प्रश्न सोडविणे प्रत्येकी 2 गुण) | 10 |

विषय क्रमांक 6 बहिस्थ परीक्षक व पेपरसेटर्स यांचे मंडळ निश्चित करणे या विषयावर चर्चेअंती पुढील ठराव करण्यात येतो की,

ठराव क्रमांक 6 विद्यार्थ्यांच्या लेखी परीक्षेचे पेपर तयार करणे, तपासणे व मॉडरेट करणे यासाठी विद्यापीठातील मान्यताप्राप्त महाविद्यालयांतील योग्य प्राध्यापकांची उपलब्धता व सुलभता लक्षात घेऊन त्यांची निवड विभागप्रमुखांनी करावी असे निश्चित करण्यात यावे.

ठराव:- हा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

सूचक :- डॉ.एल.बी.पाटील

अनुमोदक डॉ. रणधीर शिंदे

विषय क्रमांक 7. कौशल्याधिष्ठित प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत विचारविनिमय करणे.

मराठी विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी विविध क्षेत्रात असणाऱ्या व्यवसाय व रोजगाराभिमुख संधी लक्षात घेऊन तशाच प्रकारचे उपयुक्त असे प्रमाणपत्र अभ्यासक्रम घ्यावेत असे डॉ. राजश्री देशपांडे यांनी सुचविले. तसेच डॉ. नीतिन आरेकर यांनी, ‘स्वयं’ पोर्टलवरील उपयुक्त अभ्यासक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना द्यावी, त्याचबरोबर विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरतील असे अभ्यासक्रम अभ्यासमंडळातील सदस्यांनी तयार करून पोर्टलद्वारे त्यांना देण्याचा प्रयत्न करावा’ असे सुचविले. तसेच डॉ. रणधीर शिंदे यांनी ‘विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या विषयांवर तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शनपर वेबिनार आयोजित करावेत’ असे सुचविले.

यावर चर्चेअंती पुढील ठराव करण्यात येतो की,

ठराव क्रमांक 7.  १) पटकथालेखन, काव्य, नाट्य, कथा सादरीकरण मार्गदर्शन, ४) ब्लॉगलेखन, पॉवरपॉइंट प्रेझेन्टेशन ५) भाषांतर, अनुवाद यापैकी कोणताही एक व योगा, मिटकॉन उद्योगसमुह आयोजित कौशल्याधिष्ठित प्रमाणपत्र अभ्यासक्रम यापैकी विद्यार्थ्यांसाठी साधनव्यक्तींच्या उपलब्धतेनुसार कोणताही एक अभ्यासक्रम असे दोन अभ्यासक्रम निश्चित करण्यात यावेत असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

सूचक डॉ. रणधीर शिंदे

अनुमोदक डॉ वर्षा फाटक

ठराव:- हा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

विषय क्रमांक 8 एकूण अभ्यासक्रमाचे फलित ठरविणे.

द्वितीय वर्ष कला मराठीच्या विद्यार्थ्यासाठी नेमलेला यावर्षीचा व पुढील वर्षाचा अभ्यासक्रम त्यांच्या जाणिवा अधिक समृद्ध करणारा असेल हा दृष्टिकोण डोळ्यासमोर ठेवून अभ्यासक्रमाचे फलित नेमके काय असावे यावर सर्वानुमते चर्चा होऊन चर्चेअंती असा ठराव करण्यात येतो की,
ठराव क्रमांक 8.

- विद्यार्थ्यांना ई लर्निंगच्या माध्यमातून वाचन, श्रवण व लेखन या तिन्ही कौशल्यांचे मार्गदर्शन करावे.
- विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययनासाठी उद्युक्त करावे.
- साहित्याचे समाजाशी असणारे अनुबंध व बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनाची ओळख करून देणारा अभ्यासक्रम व उपक्रम राबवावेत.
- भविष्यातील रोजगार व व्यवसायाच्या संधी मिळविता याव्यात यासाठी शब्दांकन, अनुवाद, ब्लॉगलेखन, पटकथालेखन, विविध माध्यमांवरील प्रसारणे, व्याख्याने, निवेदन व सूत्रसंचालन, स्वतंत्र कार्यक्रम, मुद्रणालय, संहितालेखन या क्षेत्रात विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी त्या त्या क्षेत्रांतील तज्ज्ञांचे मार्गदर्शन आयोजित करावे.
- नाट्यतंत्र व नाटक यांच्या आकलनामुळे रंगमंचीय सादरीकरण कलांची ओळख व व्यावसायिक संधीचे मार्गदर्शन करावे.
- संशोधनाची आवड निर्माण व्हावी या हेतूने 'आविष्कार' सारख्या संशोधन महोत्सवात सहभागी होण्यास प्रोत्साहन द्यावे.

सूचक :- डॉ. तुकाराम रोंगटे

अनुमोदक:- प्रा.अजित जाधव

ठराव:- हा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

अशाप्रकारे द्वितीय वर्ष कला मराठी विषयाचा अभ्यासक्रम सर्वानुमते मंजूर करण्यात आला. प्रा.डॉ वर्षा फाटक यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून सभेचा समारोप केला.

सही

नाव: डॉ. वर्षा शिरीष फाटक
चेअरमन
मराठी अभ्यासमंडळ
आठल्ये-सप्रे-पित्रे स्वायत्त महाविद्यालय,
देवरुख

**दिनांक :-**